# श्री परशुराम प्रसन्न

चित्पावन मोडक कुलन्यास पुरस्कृत पेण निवासी मोडक आयोजित चित्पावन मोडक कुल सम्मेलन २०१६. पेण जवळील ‘निसर्ग फार्म अँड वॉटर पार्क, सापोली या निसर्गरम्य परिसरात  दिनांक १४ आणि १५ मे २०१६ रोजी संपन्न झाले.

पेण येथील श्री प्रसन्न वैजनाथ यांनी पुढाकार घेऊन आयोजित केलेल्या संमेलनास मोडक कुटुंबीयांनी, विशेषतः सर्वश्री वरुण, मंदार, वैभव, नितीन, विनीत, उमेश, सौ वेदिका आणि सौ पल्लवी ई मंडळीनी  साथ देऊन  निवास भोजनादी व्यवस्थांचे उत्कृष्ट आयोजन केले होते.  अतिशय सुंदर आणि ऐसपैस परिसर, कार पार्किंगची भरपूर व्यवस्था, वॉटर पार्क, खेळण्यासाठी मैदाने, ५००-६०० व्यक्ती सामावून घेऊ शकेल असा प्रचंड मोठा आणि सजविलेला मंडप, खुर्च्या,त्यातच भोजनाची, थंड पाण्याची व्यवस्था, जागोजागी मोठे पंखे, भव्य आणि कलात्मकतेने सजविलेले  व्यासपीठ असा सर्व जामानिमा संमेलनाच्या आयोजनासाठी सज्ज होता.

या संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे बहुतेक मंडळी सहकुटुंब आलेली होती आणि अनेकजण दिनांक १४ दुपारपासूनच हजार होती.  सुमारे २०० जणांची उपस्थिती होती. माहेरवासिनींची उपस्थितीही लक्षणीय होती.

नाव नोंदणी आणि चहापानानंतर संमेलनाचे उद् घाटनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

सर्व कार्याकार्माचे सूत्र संचालन सौ.पल्लवी आणि सौ. वेदिका यांनी मिळून केले.

श्री गणेश वंदन, श्री कोळेश्वर, श्री अंबेजोगाई माता आणि श्री परशुराम प्रतिमांचे पूजन झाल्यावर दीप प्रज्वलन होऊन संमेलनाचे उद् घाटन झाले.  अध्यक्षस्थानी पेण येथील मोडक कुटुंबातील ज्येष्ठ श्री वैजनाथ मोडक होते.  संमेलनाचे उद् घाटन झाल्याची घोषणा करून त्यांनी संमेलनाला शुभेच्छा दिल्या.

दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरवात झाली.

प्रथम  प्रमुख पाहुणे मा.श्री श्रीराम मोडक, न्यायाधीश, मुंबई यांनी उपस्थितांचे मार्गदर्शन केले. संमेलनाचे स्वरूप, प्रतिसाद याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. अशा प्रकारच्या कुल संमेलनावर होणारे  आक्षेप, टीका इत्यादी मुद्द्यांचा उहापोह करून अशी

संमेलने आवश्यक असल्याचे नमूद केले.तसेच सद्य परिस्थितीत न्यायपालिका, कार्यपालिका(लेजिस्लेचर) व प्रशासन यामध्ये चारित्र्यसंपन्न व्यक्तींची आवश्यकता आहे असे सांगून अलीकडे न्यायपालिकेतील वेतन श्रेणी चांगल्या सुधारलेल्या असल्याने आपल्यातील तरुणांनी इकडे जरूर यावे असे प्रतिपादन केले. यापुढील संमेलनात आवर्जून उपस्थित राहण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला.

चित्पावन मोडक कुलन्यासाचे अध्यक्ष श्री श्रीधर वामन यांनी सम्मेलनांची पूर्वपीठीका विषद करून या पूर्वीच्या संमेलनांचा थोडक्यात आढावा घेतला. न्यासाच्या स्थापने मागील संकल्पना, त्याची उद्दिष्टे, त्याच्या परिपूर्तीसाठी विश्वस्त करीत असलेले प्रयत्न, येणाऱ्या अडचणी, कुलवृत्तांताच्या कार्याची प्रगती याची मुद्देसूद व समर्पक मांडणी करून यथार्थ स्वरुपात माहिती दिली. न्यासाचे सचिव, श्री रमेश बाळकृष्ण घेत असलेल्या परिश्रमांचा त्यांनी गौरवपूर्ण भाषेत विशेष उल्लेख केला.

संमेलनात मोडक कुटुंबातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्तींचा प्रातिनिधिक सत्कार केला जातो. या वर्षी (१) डॉ.सौ.क्षितिजा मोडक-सोमण (२) श्री गिरीश मोडक (३) श्री श्रीधर (विकास) मोडक (४) श्री उमेश मोडक आणि (५) श्री रघुनाथ मोडक यांचा सत्कार केला गेला. यापैकी डॉ.सौ.क्षितिजा मोडक-सोमण प्रत्यक्ष संमेलनात उपस्थित राहू शकल्या नाहीत. श्री गिरीश मोडक ,श्री श्रीधर (विकास) मोडक आणि श्री उमेश मोडक यांनी त्यांचा कार्याची थोडक्यात माहिती करून दिली.

कुलवृत्तांताचा बराचसा भाग न्यासाच्या संकेतस्थळा वर आता उपलब्ध झाला आहे. २०१५मध्ये पंचनदी येथे संपन्न झालेल्या संमेलनातच हे संकेतस्थळ सर्वांसाठी खुले केलेले आहे. मात्र अद्याप त्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होताना दिसत नाही. यासाठी प्रथमपासून या कार्याची धुरा सांभाळणारे श्री हेमंत आणि श्री मंदार मोडक यांनी प्रोजेक्टर च्या सहाय्याने संकेतस्थळावरील माहिती कशी काढता किंवा वापरता येईल याचे प्रात्यक्षिक दिले.

रात्री ८ ते १०.०० या वेळात सौ.प्राजक्ता श्रेयस आपटे (श्री प्रसन्न वैजनाथ यांची भाची) आणि तिच्या सहकार्यांनी लोकप्रिय मराठी-हिंदी गाण्याचा अतिशय बहारदार कार्यक्रम सादर केला. त्यास सर्वांनी भरभरून दाद दिली.

रात्रीच्या सुग्रास भोजनानंतर विविध ठिकाणाहून आलेल्या कुल प्रतिनिधींची रात्री ११ ते १ पर्यंत अतिशय महत्वाची बैठक झाली. यामध्ये थेट इन्दोर –भोपाळहून आलेल्या प्रतिनिधीचाही समावेश होता.  सुमारे ३० व्यक्तींनी अनेक विषयावर आपले विचार मांडले.  यातील महत्त्वाचे मुद्दे : (१) अधिकाधिक व्यक्तीपर्यंत संपर्क वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचे सर्व प्रतिनिधींनी मान्य केले.  प्रत्येक प्रतिनिधींनी आपापले दूरध्वनी आणि ई-मेल संपर्क आणि देवाण-घेवाणा साठी उपलब्ध करून दिले. (२) निधी संकलनासाठी अनेक पर्याय सुचविले गेले.  सध्या न्यासाकडे वर्गणी या स्वरूपात कोणतीही रक्कम घेतली जात नाही. प्रत्येक कुटुंबाने प्रतिवर्षी किमान रक्कम रु.५००/- न्यासाकडे जमा करावी अशी सूचना सर्व प्रतिनिधींनी एकमुखाने केली. (३) यापूर्वी प्रत्येक घराण्याने किमान रक्कम रु.१० ०००/- जमा करावी आणि त्यासाठी प्रत्येक घराण्यातील एका व्यक्तीने रक्कम गोळा करण्याची जबाबदारी घ्यावी असे ठरले आणि त्यानुसार घराणेनिहाय व्यक्तींची नावेही निश्चित केली.(३) घरातील कोणत्याही मंगलप्रसंगी, आनंदाच्या प्रसंगी, दर वाढदिवसाला काही रक्कम न्यासाला द्यावी (४) तरुण मंडळीना सहभागी करण्याच्या हेतूने अनेक सूचना करण्यात आल्या.  यासाठी कोणते कार्यक्रम घ्यावे याबाबत  तरुणांकडूनच  सूचना गोळा करण्याचे श्री विनीत यांनी मान्य केले.  (५) कुलवृत्तांताच्या कामासाठी अद्याप संपर्क होऊ न शकलेले अथवा ज्यांनी माहिती दिलेली नाही अशा सर्वांनी संपर्क करण्याचे प्रतिनिधींनी मान्य केले.  या बाबत श्री श्रीधर वामन यांनी ते करीत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिले.  त्यासाठी ते स्वतः आणि श्री रमेश बाळकृष्ण इंदोरलाही जाऊन आल्याचे त्यांनी सांगितले.  एक उत्तम प्रतिसाद मिळालेली प्रतिनिधी बैठक हे या संमेलनाचे वैशिष्ठ्य आणि महत्वाची उपलब्धी मानता येईल.

बहुतेक मंडळी हि दि.१४लाच पोहोचली आणि मुक्कामाला होती हे आणखी एक वैशिष्ठ्य.  या सर्वांची व्यवस्था संयोजकांनी चांगली केली होती.

दिनांक १५ रोजी सकाळचा चहा झाल्यानंतर लहान थोर, स्त्री, पुरुष, मुले अशा सर्वच मंडळीनी थट्टा मस्करी करीत  वॉटर पार्कचा मनमुराद आनंद घेतला.  मुलांसमवेत मोठ्यांनीही क्रिकेटची धमाल केली.परस्परांमधील संकोच कमी झाला;  मनमोकळेपणा

वाढला. यासाठीच आयोजकांनी सकाळचा वेळ मोकळा ठेवला होता; तो हेतू साध्य झाला.

दिनांक १५ मे च्या सत्राची सुरवात श्री देवधर यांच्या ओघवत्या भाषेतील अभ्यासपूर्ण व्याख्यानाने झाली. त्यांचा विषय होता पेणची प्रसिद्ध गणेश मूर्ती कला. त्याच्या अनुषंगाने श्री देवधर यांनी पेणचा फारसा ज्ञात नसलेला इतिहासही सांगितला. अमूर्त चित्रकलेची पार्श्वभूमी सांगून त्याविषयीचे गैरसमज दूर करण्याचाही त्यांनी प्रयत्न केला.

या नंतरच्या सर्वसाधारण सभेत श्री अरविंद वामन, न्यासाचे कोषाध्यक्ष, यांनी सर्वसाधारण सभेची संकल्पना हि न्यासाने स्वतःवर घालून घेतलेले बंधन आणि उत्तरदायित्व असल्याचे सांगून न्यासाचे हिशेब सभेस सादर केले. २०१४-१५ चा जमाखर्च निमंत्रण पत्रीकेसोबत जोडला होता; त्यास सभेची मान्यता प्राप्त झाली. सन २०१५-१६ चा जमाखर्चाचा (लेखा परीक्षा न झालेला) तपशील सदर केला गेला. या वर्षी एकूण खर्च रु.२४१७४ आहे. झालेला खर्च हा किमान होणारा खर्च आहे; यात काट छाट शक्य नाही. विश्वस्त कोणताही मोबदला अथवा भत्ता घेत नाहीत. उलट कमी पडत असलेली रक्कम विश्वस्त स्वतः भरतात. कॉरपस वाढत नाही. यावर वर उल्लेख केलेल्या प्रमाणे दि.१४ मे २०१६ रोजीच्या प्रतिनिधी सभेमध्येही काही उपाय सुचविले गेले. ते श्री अरविंद यांनी सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी मांडले; ते सर्वांनी मान्य केले. घराणेनिहाय निधी जमा करण्याच्या सुचनेनुसार श्री संजय मोडक यांनी यापूर्वीच रक्कम रु.१००००/- जमा केली आहे. सम्मेलानामध्ये श्री श्रीधर (विकास) मोडक आणि श्री अनिल प्रभाकर यांनी रक्कम रु.१००००/-दिली व इंदूरचे श्री.अनिल गंगाधर आणि इतर मोडक यांनीपण रक्कम रु.१००००/- दिली. तसेच श्री उदयन विनायक पुणे,श्री मिलिंद अरविंद पुणे व कॅप्टन सिताराम गोपाळ पंचनदी यांनीही प्रत्येकी रक्कम रु.१००००/- लवकरच देण्याचे मान्य केले.

वर्षभरातील घडामोडींचा थोडक्यात आढावा घेण्यात आला. श्री अरविंद यांनी सांगितले की सर्व विश्वस्त पुण्यातीलच असल्याने ते अनौपचारिकरित्या अनेकदा भेटत असतात; मात्र महिन्यातून किमान एक तरी बैठक होतेच. न्यासाच्या कार्यात

पुण्याबाहेरील व्यक्तींनाही सहभागी होता आले तर त्यांचे स्वागतच आहे. सल्लागार समितीवरही सदस्य म्हणून सहभाग हवा आहे.

यानंतर सत्काराचा एक अतिशय हृद्य कार्यक्रम झाला. तो सर्वांनाच खूपच भावला.

- सर्वश्री वसंत विष्णु, पद्माकर, प्रभाकर, डॉ.मनोहर गोविंद , श्रीमती सुचिता सुधाकर, शुभदा दत्तात्रय, वसुधा विष्णु या मोडक मंडळींचा वयाची ७५ वर्षे पूर्ण केल्याबद्दल,
- सौ पुष्पलता आणि वसंत मोडक, सौ.शकुंतला आणि पद्माकर मोडक, सौ सुषमा आणि सीताराम मोडक, सौ.अंजली आणि अरविंद मोडक आणि सौ वसुधा आणि मोरेश्वर जोशी या दम्पतींचा त्यांच्या विवाहास ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल

सत्कार करण्यात आला.

- पेण मोडक मंडळींच्या वतीने सौ रजनी अशोक कुलकर्णी, सौ.वसुधा मोरेश्वर जोशी, सौ.मधुरा परांजपे, सौ.योगिता शैलेश बंगाले, सौ कल्पना प्रकाश पाठक सौ.वैशाली स्वप्नील कुलकर्णी, सौ.समिधा समीर उपाध्ये, सौ.अनिता अरविंद कुंटे, सौ.रेखा सुरेश रहाळकर आणि सौ शुभदा जयंत सहस्रबुद्धे या माहेरवाशीणींच्या ओट्या भरल्या गेल्या.

उपस्थित मंडळींचे घराणे निहाय फोटो काढले गेले.

शेवटी श्री प्रसन्न वैजनाथ यांनी न्यासाचे विश्वस्त, कार्याकार्माचे अध्यक्ष, प्रमुख पाहुणे, श्री देवधर, सर्व माहेरवाशीणीं, उपस्थित मोडक मंडळी, ध्वनीयंत्रणा पुरविणारे आणि ‘निसर्ग फार्म अँड वॉटर पार्कचे मालक श्री.काणेकर या सर्वांचे आभार मानले.

पसायदान होऊन समारंभाची सांगता झाली.

कार्यक्रमानंतर सर्वांनी आमरस पुरीच्या अत्यंत सुग्रास अशा भोजनाचा आस्वाद घेतला आणि सर्वांनी एकमेकांचा निरोप घेतला.सर्वांनीच पेणवासियांनी आयोजिलेल्या या समारंभाची मुक्त कंठाने स्तुती केली आणि त्याबद्दल संयोजकांचे आभार मानले.

*"संमेलन मोडकांचे, म्हणजे सासरचा कार्यक्रम या भावनेने मी पेणला गेले; मात्र श्री प्रसन्न त्यांचे कुटुंबीय आणि सहकारी यांनी घेतलेल्या परिश्रमांमुळे मी माहेरपणच अनुभवले "* ही सौ स्मिता संजय यांची प्रतिक्रिया पुरेशी बोलकी आणि प्रातिनिधिक अशीच आहे.

पेणवासीय मोडकांनी अतिशय परिश्रमपूर्वक केलेले अत्यंत उत्कृष्ट आयोजन हे पेणच्या संमेलनाचे वैशिष्ट्य ठरले; त्याबद्दल आयोजाकांचे जेवढे कौतुक आणि अभिनंदन करावे तेवढे कमीच ठरेल!